आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

९ एप्रिल २०२४ - मंगळवार

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्रात काँग्रेस १७ जागा लढवणार असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट १० तर शिवसेना उद्धव ठाकरे गट २१ मतदारंघात उमेदवार उभे करणार आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाची अंतिम घोषणा आज मुंबईत शिवालय इथं करताना शिवसेना नेते संजय राऊत यांनी ही माहिती दिली. मुंबईत एकूण ६ जागांपैकी ४ जागांवर शिवसेना तर २ जागांवर काँग्रेस लढणार आहे. या बरोबरच काँग्रेस नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापुर, रामटेक आणि मुंबई उत्तर आणि उत्तर मध्य या मतदार संघातून लढणार आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, बारामती, शिरुर, सातारा, भिंवडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर दक्षिण आणि बीड या जागांवर लढणार आहे. शिवसेना मुंबईच्या चार जागांबरोबरच जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी, बुलडाणा, हातकणंगले, संभाजी नगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ वाशिम आणि मुंबईतल्या ४ मतदार संघात लढणार आहे. सर्व घटक पक्ष एकदिलानं लढून विजय मिळवतील असा विश्वास यावेळी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला. यावेळी शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते.

<><><><><>

लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी देशभरातल्या ८८ मतदारसंघात एकूण बाराशे दहा  उमेदवार रिंगणात असल्याचं काल अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी स्पष्ट झालं.

या टप्प्यात राज्यातल्या ८ मतदारसंघांत  आता २०४ उमेदवार रिंगणात आहे. अमरावतीमध्ये ३७, परभणीत ३४, हिंगोलीत ३३, वर्ध्यात २४, नांदेडमधे २३, बुलडाण्यात २१, यवतमाळ-वाशिममध्ये १७ आणि अकोल्यात १५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण नांदेड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळात आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

राज्यात चैत्र प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्याचा सण उत्साहात साजरा होत आहे. शालिवाहन शके १९४६ या नववर्षाचं स्वागत करण्यासाठी

राज्यात ठिकठिकाणी शोभायात्रा काढण्यात आल्या. ऐकूया त्याबाबतचा

**वृत्तांत---- होल्ड---- व्हॉईसकास्ट-.**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशवासियांना गुढीपाडव्यानिमित्त,तसंच चैती चांद, नवरेह, युगादि आणि इत्यादी सणांच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

*आज चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात मराठी नववर्षाचा पहिला दिवस आणि साडेतीन मुहुर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या गुढी पाडव्याचा सण. गुढीपाडव्याचा हा सण आज राज्यभरात उत्साहात साजरा केला जातो आहे. या सणानिमीत्त राज्यातली सर्वच शहरं आणि ग्रामीण भागात घरोघरी उंच गुढी उभारल्याचं चित्र दिसतं आहे. उंच काठीला कडूनिंबाची डहाळी, त्याला गुंडाळलेलं रेशमी वस्त्र , फुलांचा हार आणि साखरेच्या गाठ्या आणि सर्वात वर तांब्यांचा किंवा इतर धातुचा कलश अशा सजलेल्या उंच गुढ्या जागोजागी दिसत आहेत.*

*गुढीपाडव्यानिमीत्त अनेक ठिकाणी स्वागतयात्रा, शोभायात्रा आणि मिरवणुकांचं आयोजनही केलं गेलं.*

***ठाणे** शहरात काढलेल्या स्वागत यात्रेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी कौपिनेश्वर महाराजांची पालखी खांद्यावर घेतली तसंच पालखीवर पुष्पवृष्टीही केली.*

***मुंबईतही गिरगाव, दादर, बोरिवलीसह*** *अनेक ठिकाणी शोभायात्रा काढली गेली. गिरगावात काढलेल्या शोभायात्रेत सहभागी लाठीकाठ्या पथकांनी सादर केलेल्या खेळांसह, ढोल पथकांच्या ताल कौशल्यानं नागरिकांना संमोहीत केलं. या शोभायात्रेत सर्वच वयोगटातले नागरिक पारंपरिक आणि मराठमोळ्या वेशभूषेत सहभागी झाले होते. दादरमध्ये भारत मंथन फाऊंडेशननं गुढीपाडवा पूजन आणि शोभायात्रेचं आयोजन केलं होतं. यावेळी दादरच्या राम गणेश गडकरी चौक ते राजा बढे चौकपर्यंत शोभायात्रा काढली गेली. धारावीतही पुनर्विकासाची गुढी उभारली गेली.*

राज्यात इतरत्रही नववर्षस्वागताच्या शोभा यात्रा काढण्यात आल्या त्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाण च्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

//<><><><><>//